# जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.

## -: दरपत्रक सुचना :-

जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा व त्याअंतर्गत असलेले वर्धा येथील दुय्यम न्यायालयातील तसेच विभागातील अग्नीशामक यंत्रांमध्ये नविन गॅस भरुन रिफिलींग करावयाचे आहे. स्थानिक बाजारातील विक्रेत्यांना/संस्थेला सुचित करण्यात येत आहे की, ज्यांना अग्निशामक यंत्रे रिफिलींग करण्याबाबतचे दरपत्रक दाखल करावयाच्या असतील, त्यांनी 'दरपत्रक' सिलबंद लिफाफ्यामध्ये जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील कार्यालयात दिनांक ०४/०३/२०२४ ला सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत न चुकता सादर करावेत तसेच दरपत्रक लिफाप्यावर 'अग्निशामक यंत्राचे रिफिलींग करण्याबाबतचे दरपत्रक' असे ठळक अक्षरात लिहावे. तसेच खालील नमुनाप्रमाणे गॅस रिफीलींगचे दर दरपत्रकात नमुद करावे.

| अ. क्र. | अग्निशमन यंत्र रिफलींगचा तपशील | दर प्रती नग |
|---|---|---|
| 1 | **Refilling of Water /Co2 9 Liter Fire Extinguisher** | प्रति नग |
| 2 | **Refilling of DCP 5 Kg Fire Extinguisher** | प्रति नग |
| 3 | **Refilling of DCP 10 Kg Fire Extinguisher** | प्रति नग |
| 4 | **Refilling of ABC 6 Kg Fire Extinguisher** | प्रति नग |

टिप :- जिल्हा न्यायालयातील अग्निशामक यंत्रे जिल्हा व सत्र न्यायालयाचे परिसरातच रिफिलींग करावे लागतील. तसेच सदर अग्निशामक यंत्राविषयी सर्वसाधारण माहिती व आवश्यकता पडल्यास त्याचा तातडीने व योग्य प्रकारे उपयोग कसा करावा याबाबतची सविस्तर माहिती या आस्थापनेवरील कर्मचारी वर्ग यांना रिफिलींग करण्याचे दिवशी प्रात्यक्षिकाव्दारे दयावी लागेल.

स्वा./-
(संजय भारूका)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा.

दरपत्रकाच्या अटी व शर्ती :-

१. वेळेनंतर प्राप्त झालेल्या 'दरपत्रकाचा' कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.
२. दरपत्रकाच्या लिफाफ्यावर 'अग्निशामक यंत्राचे रिफिलींग करीता दरपत्रक' असे ठळक अक्षरात लिहावे.
३. दरपत्रकातील दर सर्व करांसह समावेश असलेला दरांसह नमुद करावे.
४. दरपत्रक मंजुर किंवा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा अंतर्गत गठीत स्थानिक खरेदी समितीला राहिल.
५. दरपत्रकात वरील नमुद केल्याप्रमाणेच दरपत्रकात गॅस रिफीलींगचे दर नमुद करावे. वरील नमुद केल्याप्रमाणे दरपत्रकात दर नमुद केले नसल्यास दरपत्रकाचा विचार केल्या जाणार नाही.

पृष्ठांकण क्र. ९२५/रो.व.वि.वि./२०२४.
जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा.
दिनांक :२६/०२/२०२४.
प्रतीलीपी: माहीती व योग्य कार्यवाहीस अग्रेषित
१) जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
२) जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
३) जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
४) तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
५) सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरीता.
६) जिल्हा संगणक प्रणाली, जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्द्धीकरीता.

२६.२.२४

प्र.प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय,
वर्धा.

D:\Stationery\Purchesing Committee 2023\New Nivida-2022.odt